तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

1 · A 24004

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१३/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे काय
दिनांक:- 2 DEC 2013

A) ③

प्रति

अध्यक्ष/सचिव,

माऊंट झायन एज्युकेशन ट्रस्ट , हडपसर

विषय - सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचो शासन निर्णय क्र.स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II)/माशि-१ दिनांक ०५ ऑक्टोंबर २०१३.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने दर्शापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १७८ | पुणे | माऊंट झायन एज्युकेशन ट्रस्ट , हडपसर | अंबडट लाईफ स्कुल, महंमदवाडी हडपसर | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक | २०१३-१४ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१०. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.
११. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

Principal
ABUNDANT LIFE SCHOOL
Mohammadwadi

२८/११/१३
(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा.सु.न.जोशी,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

ABUNDANT LIFE SCHOOL
PUNE - 28
MOHAMMADWADI

Principal
ABUNDANT LIFE SCHOOL
Mohammadwadi

President
Mount Zion Educational Foundation